**अमृततर्फे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) दुय्यम सेवा अराजपत्रित (गट - ब) अंतर्गत पोलिस उप निरीक्षक मुख्य परीक्षा - २०२३ उत्तीर्ण उमेदवारांना मुलाखतीच्या तयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य.**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील, अमृतच्या लक्षित गटातील, उमेदवारांना 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) **दुय्यम सेवा अराजपत्रित (गट - ब)** सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी उत्तीर्ण उमेदवारांना प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य' (सन २०२४ -२५) योजना राबविण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये **पोलिस उप निरीक्षक मुख्य परीक्षा - २०२३** उत्तीर्ण झालेल्या आणि आर्थिक सहाय्याचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी संबंधितांनी www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला अsर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावा, अर्ज सादर करण्यापूर्वी सुचनांचे पालन करावे. सदर योजनेविषयी भविष्यात कोणतीही माहिती /सूचना केवळ अमृतच्या संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील. वृत्तपत्रात जाहिरात दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. योजनेच्या अधिक माहितीसाठी व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी काही शंका असल्यास अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रकरण न्याय प्रविष्ट असल्यास, न्यायालयाच्या निर्णयानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सुधारित निकालाच्या यादीप्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावा. अर्जाच्या प्रतीसोबत आवश्यक कागदपत्रे स्वयं साक्षांकित करून अमृतच्या पत्त्यावर टपालाने अथवा प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक आहे.

**कार्यालयाचा पत्ता** - महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन,
पाचवा मजला, औंध, पुणे – ४११ ०६७

**ऑनलाइन /संकेतस्थळावर अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक – ३०/०८/२०२४**

**ऑनलाइन अर्जाची प्रत व अपलोड केलेले कागदपत्रांची स्वयंसाक्षांकित प्रत (हार्ड कॉपी) अमृत संस्थेत पाठविण्याचा अंतिम दिनांक ०६/०८/२०२४ संध्या. ०४.०० वाजेपर्यंत**

व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)

महाराष्ट्र राज्य, पुणे.